जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 JUL 2021
पुण्यनगरी

# अण्णा भाऊ साठे अध्यासनातर्फे व्याख्यान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या अण्णा भाऊ साठे अध्यासनातर्फे साठे यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. यामध्ये दि. १ ऑगस्ट रोजी, दुपारी १२.३० वाजता 'अण्णा भाऊ साठे जीवन आणि साहित्य' या विषयावर प्राचार्य डॉ. आनंद मेणसे यांचे व्याख्यान आयोजित केले आहे. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आहेत. तसेच दि. २ रोजी, 'कविता प्रबोधनाची' हे कविसंमेलन आयोजित केले आहे. याचे अध्यक्षस्थान आबा पाटील (मंगसुळी) हे भूषवणार आहेत. तर रमजान मुल्ला (नागठाणे), चंद्रशेखर कांबळे (राधानगरी), विनोद कांबळे (तिसंगी), लता ऐवळे (अंकलखोप), प्रकाश नाईक (सरूड) यांचा सहभाग असणार आहे, अशी माहिती समन्वयक डॉ. रणधीर शिंदे यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 JUL 2021
सकाळ

# अण्णा भाऊ साठे अध्यासना तर्फे कविसंमेलन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या अण्णा भाऊ साठे अध्यासना तर्फे लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम होणार आहेत. त्यात गुरुवारी (ता. १) दुपारी साडेबारा वाजता 'अण्णा भाऊ साठे जीवन आणि साहित्य' या विषयावर प्राचार्य डॉ. आनंद मेणसे यांचे व्याख्यान होणार आहे. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के असणार आहेत. शुक्रवारी (ता. २) 'कविता प्रबोधनाची' हे कविसंमेलन आयोजित केले आहे. या संमेलनाच्या अध्यक्षस्थानी आबा पाटील (मंगसुळी) असणार आहेत. या संमेलनामध्ये कवी रमजान मुल्ला (नागठाणे), चंद्रशेखर कांबळे (राधानगरी), विनोद कांबळे (तिसंगी), लता ऐवळे (अंकलखोप), प्रकाश नाईक (सरूड) सहभागी असतील, अशी माहिती अध्यासनाचे समन्वयक प्रा. डॉ. रणधीर शिंदे यांनी दिली.

30 JUL 2024 सकाळ जनसंपर्क कक्ष
विद्यापीठ, कोल्हापूर

# गुरुवारपासून सुरु होणार विद्यापीठ परीक्षा

## लॉ., एम. फार्मसी अभ्यासक्रमांचा समावेश

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २९ : शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील अतिवृष्टीमुळे २२ जुलैपासून पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा स्थगित करण्यात आल्या. त्या परीक्षा गुरुवार (ता.१) पासून सुरू करण्याचा निर्णय विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाने घेतला आहे. प्रवेश प्रक्रियेची मुदत वाढविण्यात आली आहे.

कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यात २१ जुलैपासून अतिवृष्टी सुरू झाली. त्यामुळे वाहतुकीचे अनेक मार्ग बंद झाल्याने विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्रावर येणे अडचणीचे ठरत होते. ते लक्षात घेऊन विद्यापीठाने २२ जुलै आणि त्यानंतर पुढील सात दिवसांच्या परीक्षा स्थगित केल्या. आता पावसाने उघडीप दिल्याने पुराचे पाणी ओसरत आहे. त्याने वाहतुकीसाठी मार्ग खुले




होऊ लागले आहेत. त्यामुळे विद्यापीठाने स्थगित केलेल्या परीक्षा गुरुवारपासून पूर्ववत सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यादिवशी लॉ (विधी, तीन आणि पाच वर्षे), एम. फार्मसी., बी. फार्मसी (दुसरे वर्ष), विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभाग बी. टेक. अभ्यासक्रमाची पुनर्परीक्षा होणार आहे. एम. एस्सी., केमिस्ट्री, बॉटनी, एमजेसी., बीजेसी, आदी विविध अभ्यासक्रमांची प्रवेश परीक्षा देखील यादिवशी घेतली जाणार असल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

दरम्यान, विद्यापीठातील अधिविभाग आणि कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील संलग्नित महाविद्यालयात विविध पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेशाची प्रक्रिया सुरु आहे. मात्र, अतिवृष्टीमुळे ती प्रक्रिया पूर्ण करणे अनेक विद्यार्थ्यांना शक्य झाले नाही. ते लक्षात घेवून विद्यापीठाने प्रवेश प्रक्रियेची मुदत वाढविण्याचा निर्णय घ्यावा आणि त्याबाबत अधिविभागप्रमुख, प्राचार्यांना सूचना करावी, अशी मागणी व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे यांनी कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडे केली होती. त्यावर सकारात्मक कार्यवाही करत विद्यापीठ प्रशासनाने प्रवेश प्रक्रियेची मुदत वाढविली आहे. त्यात एमबीएसह अन्य अभ्यासक्रमांचा समावेश असल्याचे शिंदे यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 JUL 2024
पुण्यनगरी

# विद्यापीठाच्या परीक्षा गुरुवारपासून

**कोल्हापूर :** कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील पूर परिस्थितीमुळे शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा दि. २२ जुलैपासून स्थगित केल्या होत्या. या परीक्षा आता गुरुवार, दि. १ ऑगस्टपासून घेतल्या जाणार आहेत. परीक्षेचे सुधारित वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिल्याची माहिती शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी पत्रकाद्वारे दिली आहे. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील तिन्ही जिल्ह्यांतील रस्ते पुराच्या पाण्यामुळे बंद झाले होते. त्यामुळे सोमवार, दि. २२ रोजीपासून विद्यापीठाच्या परीक्षा स्थगित करण्यात आल्या होत्या. पूर ओसरू लागल्याने या अभ्यासक्रमाच्या परीक्षा गुरुवार, दि. १ ऑगस्टपासून घेण्यात येणार आहेत. या परीक्षेचे सविस्तर वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आले आहे.



**प्रवेश परीक्षाही गुरुवारी**

विद्यापीठाच्या पदव्युत्तर प्रवेश अभ्यासक्रमाच्या परीक्षांचे आयोजन दि. २९ जुलै रोजी विद्यापीठाच्या अभियांत्रिकी अधिविभागात केले होते. पुरामुळे स्थगित केलेल्या या परीक्षाही दि. १ ऑगस्ट रोजी होणार आहेत.


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 JUL 2024
तरुण भारत

# विद्यापीठाच्या ३१ जुलैपर्यंतच्या स्थगित परीक्षा १ ऑगस्टपासून

प्रतिनिधी

कोल्हापूर

विद्यापीठ परिक्षेत्रात पूर आल्यामुळे शिवाजी विद्यापीठ अंतर्गत २९ जुलै रोजीच्या स्थगित करण्यात आलेल्या पदव्युत्तर प्रवेश परीक्षा १ ऑगस्ट रोजी नियोजित ठिकाणी होणार आहेत. तसेच बी. टेक., आर्किटेक्चर, विधी, फार्मसीच्या २२ ते ३१ जुलैपर्यंतच्या स्थगित करण्यात आलेल्या सर्व परीक्षा १ ऑगस्ट पासून होणार आहेत. या अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे सुधारीत वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात आले आहे. तरी याची महाविद्यालयांसह विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी, असे आवाहन शिवाजी विद्यापीठ परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले आहे.



- **परीक्षा व मूल्यमापन मंडळाची परिपत्रकाव्दारे माहिती**

कोल्हापूर, सांगली, सातारा तिन्ही जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे पूर आला होता. त्यामुळे २२ ते ३१ जुलैपर्यंतच्या सर्व परीक्षा स्थगित करण्यात आल्या आहेत. त्यामुळे ३० व ३१ जुलैचे पेपरही स्थगित केले आहेत. या सर्व परीक्षा १ ऑगस्टपासून सुधारीत वेळापत्रकाप्रमाणे होतील. सुधारीत वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेत स्थळावर जाहीर केले आहे. तरी विद्यार्थ्यांनी याची नोंद घेवून नियोजित वेळेत परीक्षेला उपस्थित राहावे, असे आवाहन केले आहे.

30 JUL 2024

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाच्या स्थगित सर्व परीक्षा १ ऑगस्टपासून

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

अतिवृष्टी व महापुरामुळे शिवाजी विद्यापीठानें २२ जुलैपासून स्थगित केलेल्या सर्व अभ्यासक्रमांच्या परीक्षा १ ऑगस्टपासून सुरू होणार आहेत.

मार्च-एप्रिल २०२४ उन्हाळी सत्रातील परीक्षा सध्या सुरू आहेत. कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील अतिवृष्टीमुळे विद्यापीठाने टप्प्याटप्प्याने परीक्षा रद्द केल्या होत्या. सध्या नद्यांच्या पाणीपातळी संथगतीने उतरत आहे. या पार्श्वभूमीवर विद्यापीठाने परीक्षा पुन्हा घेण्याचे नियोजन केले आहे. स्थगित केलेल्या पदव्युतर प्रवेश परीक्षा तसेच बी.टेक., आर्किटेक्चर, विधी, फार्मसी आदी अभ्यासक्रमांच्या परीक्षा १ ऑगस्टपासून सुरू होणार आहेत. परीक्षांचे सुधारित वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येत असल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.



जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 JUL 2024

लोकमत

# नॅनो मटेरियल परिषद सदस्यपदी राहुल माने

कोल्हापूर : दहाव्या आंतरराष्ट्रीय नॅनो मटेरियल बार्सिलोना स्पेन परिषदेच्या सायंटिफिक कमिटी सदस्यपदी



शिवाजी विद्यापीठातील रसायनशास्त्राचे सहायक प्राध्यापक डॉ. राहुल माने यांची निवड झाली. ही परिषद स्पेनमध्ये ७ ते ९ एप्रिल २०२५ मध्ये होणार आहे. या परिषदेच्या २० सदस्यांमध्ये जगभरातील प्राध्यापक, अभ्यासक यांचा समावेश आहे. या कमिटीत भारतातून दोनच सदस्य असून त्यामध्ये डॉ. माने यांचा समावेश आहे.